स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## राष्ट्रीय सेवा योजना
गणेशखिंड, पुणे – ४११ ००७

प्रा.डॉ. गणेश भामे
एम्.ए., पीएच् डी.
संचालक (अतिरिक्त कार्यभार)

कार्यालय क्र. : ०२०–२५६२२६८८/८९
: ०२०–२५६२२६९०/९१
: ०२०–२५६२२६९२
: ०२०–२५६९७३४१

---

**संदर्भ : रासेयो/२०२६–२७/२६१** **दि. २६/०९/२०२६**

**प्रति,**
**मा. प्राचार्य व रासेयो कार्यक्रम अधिकारी**
**रासेयो संलग्नित व स्वायत्त महाविद्यालये व परिसंस्था,**
**सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ**
**पुणे, अहिल्यानगर व नाशिक जिल्हा**

**विषय : राष्ट्रीय सेवा योजना सन २०२६–२७ वार्षिक नियोजन कार्यशाळेबाबत...!**

महोदय/महोदया

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे सन २०२६–२७ मध्ये राबवण्यात येणाऱ्या **वार्षिक उपक्रमांची नियोजन कार्यशाळा,** राष्ट्रीय सेवा योजना संलग्नीत पुणे, अहिल्यानगर व नाशिक जिल्ह्यामधील सर्व महाविद्यालयातील कार्यक्रम अधिकाऱ्यांकरिता **दिनांक ७ व ८ ऑक्टोबर, २०२६ रोजी लेण्याद्री देवस्थान ट्रस्ट, जुन्नर** येथे आयोजित करण्यात आलेली आहे. सदर कार्यशाळेकरिता प्रत्येक महाविद्यालयामधून एक रासेयो कार्यक्रम अधिकारी सहभागी होणे अनिवार्य आहे. या करिता आपल्या महाविद्यालयातील **एक रासेयो कार्यक्रम अधिकारी** यांनी **दिनांक ३० सप्टेंबर, २०२६** पर्यंत पुढील लिंकद्वारे नावनोंदणी करून वरील कालावधीत अनिवार्यपणे उपस्थित रहावे.

या कार्यशाळेमध्ये रासेयोचे वर्षभर चालणारे उपक्रम अधिक प्रभावी होण्याकरिता मार्गदर्शन करण्यात येणार आहे. ERTI सेंटर, अहिल्यानगर या ठिकाणी महाराष्ट्रातील सर्वच कार्यक्रम अधिकाऱ्यांना रासेयोचे उपक्रम अधिक प्रभावी होण्याकरिता आणि रासेयो कार्यपद्धतीबाबत प्रशिक्षीत केले जाते, तथापी मागील सहा वर्षांपासून ERTI सेंटर मार्फत कार्यक्रम अधिकाऱ्यांकरिता प्रशिक्षण घेतले गेले नाही. त्यामुळे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी यांना रासेयो उपक्रमांकरिता प्रशिक्षण देण्याकरिता आणि शैक्षणिक वर्ष २०२६–२७ मधील रासेयो उपक्रमांची रूपरेषा ठरवण्याकरिता रासेयो कार्यक्रम अधिकाऱ्यांसाठी प्रशिक्षण व नियोजन दोन दिवसीय कार्यशाळा श्री. लेण्याद्री गणपती देवस्थान ट्रस्ट, लेण्याद्री येथे आयोजित करण्यात आलेली आहे.

| क्र | सभेचे ठिकाण | विभाग | दिनांक | वेळ | तपशील |
|---|---|---|---|---|---|
| १ | लेण्याद्री देवस्थान ट्रस्ट सभागृह, मु.पो. गोळेगाव, ता. जुन्नर, जि. पुणे | पुणे, नाशिक व अहिल्यानगर जिल्हा | ७ ऑक्टोबर २०२६ | सकाळी १०.०० ते ११.३० | नावनोंदणी |
| | | | | दुपारी १२.०० ते ०१.०० | प्रथम सत्र : उद्घाटन |
| | | | | दुपारी ०२.०० ते ०७.०० | द्वितीय सत्र |
| २ | | | ८ ऑक्टोबर २०२६ | सकाळी ०७.०० | लेण्याद्री दर्शन (ऐतिहासिक वारसा) |
| | | | | सकाळी ९.३० ते दुपारी १२.०० | तृतीय सत्र |
| | | | | दुपारी १.०० ते ०४.३० | गटचर्चा व समारोप |
| नावनोंदणी लिंक : https://bcud.unipune.ac.in/NSS/NSS_Registration/NSS_PO_Registration.aspx | | | | | |
| Or BOD Login ▸ NSS ▸ रासेयो अधिकारी नावनोंदणी | | | | | |

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने सन २०१७–१८ या वर्षीपासून राष्ट्रीय सेवा योजना कार्यप्रणाली पूर्णतः ऑनलाईन (Online) करण्यात आली आहे. महाविद्यालयांनी राष्ट्रीय सेवा योजना एकक मागणी प्रस्ताव ऑनलाईन (Online) भरण्याकरिता दि. २५/०६/२०२६ रोजी (संदर्भः रासेयो/२०२६–२७/९८) निर्गमीत केलेल्या परिपत्रकाद्वारे कळविण्यात आलेले होते. ज्या महाविद्यालयांनी ऑनलाईन प्रस्ताव सादर केले आहेत त्याच महाविद्यालयांना कार्यशाळेकरिता ऑनलाईन नोंदणी करता येईल. कार्यशाळेकरिता नोंदणी करण्यासाठी महाविद्यालयाने प्रथम प्रस्ताव भरणे गरचेचे आहे.

राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी वार्षिक नियोजन सभेदरम्यान सन २०२६–२७ या वर्षामधील विविध उपक्रम, कार्यशाळा याबाबत सविस्तरपणे माहिती देण्यात येणार आहे. त्यामुळे सदर वार्षिक नियोजन सभेकरिता एक कार्यक्रम अधिकारी, विभाग समन्वयक आणि जिल्हासमन्वयक यांनी वरील नियोजनानुसार **दि. ७ ऑक्टोबर, २०२६ रोजी सकाळी १०.०० वाजेपर्यंत देण्याद्री देवस्थान ट्रस्ट सभागृह, जुन्नर याठिकाणी दोन दिवसीय निवासी कार्यशाळेकरिता** अनिवार्यपणे उपस्थित राहावे. कळावे, ही विनंती. महाविद्यालय ते लेण्याद्री व परत महाविद्यालय असा प्रवासखर्च रासेयो नियमित कार्यक्रमातून करण्यात यावा.

Bhame.

**टिप : दिनांक ३० सप्टेंबर, २०२६ पर्यंत नावनोंदणी करणे आवश्यक आहे.**

**संचालक (अतिरिक्त कार्यभार)**
**राष्ट्रीय सेवा योजना**